**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१८.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०६ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. शिवाजी हणमंत सुगरे<br>सलगरवस्ती, डोणगाव रोड, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक)<br>जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षणाधिकारी (प्राथमिक)<br>जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. शिवाजी हणमंत सुगरे यांनी सौ. उज्वलाताई शिंदे प्राथमिक शाळा अनधिकृत म्हणून घोषित करण्याकामी ठेवलेली कार्यालयीन टिप्पणी, त्यावर पुढील कार्यवाही करण्यासंबंधी संबंधितांशी केलेला पत्रव्यवहार, अंतिम केलेली कारवाईची माहिती, मूळ बाल विकास मंदिर न्यू हायस्कूल जागेत स्थलांतर प्रस्ताव व त्यास दिलेली मंजुरीची नक्कल, सौ. उज्वलाताई शिंदे शाळेकडून प्राप्त शिक्षक / शिक्षकेतर मान्यतेस आलेल्या प्रस्तावांची नक्कल, शाळेतील शिक्षकांच्या आलेल्या वेतन बिलाच्या नकला, वेतनबिले मंजूर करण्यास असणाऱ्या शासन निर्णयांच्या प्रती, जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे मागितल्या होत्या. माहिती देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी यांनी लेखी नमूद केले. कार्यालयाकडील माहिती दिली, शाळेशी संबंधित माहिती देण्याबाबत शाळेच्या जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक विद्यामंदिर, सलगरवाडी यांना कळविले, असे उप शिक्षणाधिकारी यांनी आयोगाला सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे. मात्र माहिती आपल्याला मिळाली नसल्याचे श्री. सुगरे यांचे म्हणणे आहे. संबंधित माहिती शिक्षण खात्याच्या अभिलेखावर उपलब्ध असल्याचे श्री. सुगरे यांनी निवेदनात म्हटले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. शिक्षण खात्याच्या अभिलेखावर असलेली माहिती पंधरा दिवसांत अपीलकर्त्यास द्यावी.

३. संबंधित शाळेने १५ दिवसांत माहिती न दिल्यास जन माहिती अधिकारी यांच्यावर अपिलीय प्राधिकारी यांनी कारवाई करावी.

४. वरील क्र. २ व ३ बाबत अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दि. २०.९.२००८ पर्यंत आयोगाला अनुपालन अहवाल सादर करावा.

**पुणे**
**दि. 30 .८.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौंसिल हॉलसमोर,
पुणे -४११ ००१

श्री.मल्लिकार्जुन सिद्राम मोरडे
मु.पो.मुस्ती, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपिलीय अधिकारी,
श्री स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सह. सूतगिरणी नि.,
वळसंग, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शासकीय माहिती अधिकारी,
श्री स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सह. सूतगिरणी नि.,
वळसंग, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१० / सोलापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३१.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मल्लिकार्जुन सिद्राम मोरडे
मु.पो.मुस्ती, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपिलीय अधिकारी,
श्री स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सह. सूतगिरणी नि.,
वळसंग, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर श्री.विठ्ठल बसण्णा दूने

**जन माहिती अधिकारी** तथा शासकीय माहिती अधिकारी,
श्री स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सह. सूतगिरणी नि.,
वळसंग, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर श्री.राजशेखर सिद्रामप्पा पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.५.२०६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.६.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन १९८० पासून **श्री** स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सह. सूतगिरणीच्या प्रोसिडिंगची नक्कल व लेखा परिक्षक यांचे ऑडिट रिपोर्ट व प्रमाणित नकला मिळण्याबाबत. | |

## विवेचन

श्री स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सह. सूतगिरणी नि., वळसंग, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर या संस्थेच्या सन १९८० पासूनच्या कार्यवृत्तांत व लेखा परीक्षण याच्या प्रमाणित नकला अपीलकर्ता श्री.मल्लिकार्जुन सिद्राम मोरडे यांना जन माहिती अधिकारी तथा श्री स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सह. सूतगिरणी नि., वळसंग, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर यांच्याकडे मागितल्या होत्या. ही माहिती जन माहिती अधिकाऱ्यांकडून नाकारली गेल्यामुळे श्री.मोरडे यांनी अपिलीय प्राधिकारी, श्री स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सह. सूतगिरणी नि., वळसंग, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर यांच्याकडे अपील केले. नियमानुसार विहित शुल्क भरुन घेऊन संबंधित माहिती श्री.मोरडे यांना द्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी यांनी दिले. त्यानुसार रुपये १८१०४/- शुल्क भरण्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.मोरडे यांना कळविले. श्री.मोरडे यांनी शुल्क भरले नाही व विलंबामुळे आपल्याला माहिती निःशुल्क मिळावी अशी मागणी केली, ती न मिळाल्यामुळे श्री.मोरडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

उपरोक्त सूत गिरणीकडे श्री.मोरडे सातत्याने विविध प्रकारच्या माहितीची मागणी करीत असतात व कळविलेले शुल्क भरीत नाहीत. लेखा परीक्षण अहवाल व कार्यवृत्तांत यांची माहिती यापूर्वीही त्यांनी दि.१७.१.२००६ रोजी मागितली होती, व त्यानंतर ती आपल्याला नको असल्याचे दि.२३.२.२००६ च्या पत्रान्वये कळविले. आता पुन्हा त्यांनी मागणी केल्यानंतर

त्यांना विहित मुदतीत उत्तर दिले, असे जन माहिती अधिकारी श्री.राजशेखर सिद्रामप्पा पाटील यांनी श्री.मोरडे यांना कळविले होते. हे उत्तर योग्य नसल्याचा निर्णय अपिलीय प्राधिकारी यांनी दिला असून तो योग्य आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी श्री.राजशेखर सिद्रामप्पा पाटील यांनी विहित मुदतीत पत्रव्यवहार केला आहे. प्रथम अपिलाचा निर्णय झाल्यानंतर शुल्काबाबतही त्वरित कळविले आहे. माहितीचे स्वरुप व एकूण कागदपत्रे यांचा विचार करता माहिती निःशुल्क देण्याचे कारण नाही. मात्र रु.२ प्रतिपृष्ठ असे शुल्क न आकारता छायांकित प्रतींना येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाची रक्कम घेऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी, असा निर्णय आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. दि.१५.२.२००८ रोजी आपण माहिती घेण्यास जाऊ, असे श्री.मोरडे यांनी सांगितले, त्यानुसार आपल्याला आवश्यक ती माहिती मिळाली असून आपली तक्रार राहिलेली नसल्याचे दि.१५.२.२००८ च्या अपिलीय प्राधिकाऱ्यांना लिहिलेल्या पत्रान्वये श्री.मोरडे यांनी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.४.८.२००८**
**ऑगस्ट-०८-३७-३९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौंसिल हॉलसमोर,
पुणे -४११ ००१

श्री.शिवशरण मल्लशेप्पा घत्तरगी
१६ अ, जवाननगर, विजापूर रोड, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपिलीय प्राधिकारी, संगमेश्वर कॉलेज,
सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
संगमेश्वर कॉलेज, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २११ / सोलापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १.२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवशरण मल्लशेप्पा घत्तरगी
१६ अ, जवाननगर, विजापूर रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपिलीय प्राधिकारी,
संगमेश्वर कॉलेज, सोलापूर डॉ.एल.एन.चिट्टे

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, संगमेश्वर कॉलेज, सोलापूर श्री.एस.एम.तोडकरी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती |
|---|---|
| | इंग्रजी विषयाचा वर्ग २००१-०२ पासूनचा कार्यभार व शिक्षण सहसंचालक, कोल्हापूर यानी मंजूर शिक्षक पदसंख्या दर्शविणारे प्रपत्र, शिवाजी विद्यापीठाचे पदमान्यता पत्र व रोस्टरची प्रत, शिवाजी विद्यापीठाने विशेष भरती मोहिमेअंतर्गत मंजूर जाहिरात व संबंधित शासन निर्णय व तदनुषंगिक कागदपत्रे, तुकडी मंजुरी पत्र, नवीन भरती झालेले शिक्षकास नेमणूक दिनांकापासून म्हणजे दि.१० फेब्रुवारी २००४ ते फेब्रुवारी २००५ पर्यंत व १९ जून २००५ पासून डिसेंबर २००५ पर्यंत वेतन दिले आहे का, शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण कोल्हापूर विभाग यांचे इंग्रजी विषयाच्या कार्यभारा संदर्भातील पत्र. |

## विवेचन

संगमेश्वर महाविद्यालयातील सन २००१/२००२ पासूनचा इंग्रजी विषयाचा कार्यभार, तुकडी मंजुरीचा आदेश आदीबाबतची माहिती अपीलकर्ता प्रा.शिवशरण मल्लशेप्पा घत्तरगी यांनी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, संगमेश्वर कॉलेज, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. महाविद्यालयात अपिलीय प्राधिकारी नसल्याचे नमूद करुन प्रा.घत्तरगी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

प्रा.घत्तरगी संगमेश्वर महाविद्यालयात इंग्रजी विषयाचे विभागप्रमुख होते. मूलतःच केवळ सहा तासाचे काम ठरलेले असताना पूर्णवेळ अध्यापक पदाची जाहिरात देऊन नियुक्ती केली आहे व त्यापोटी लाखो रुपयाचे वेतन अदा करुन शासनाची फसवणूक व लुबाडणूकही केली आहे, असा आरोप प्रा.घत्तरगी यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी केला. परिविक्षाधीन कालावधीतील कर्मचाऱ्याला अन्य काम देऊन सेवेत ठेवता येते का, संरक्षण देता येते का, असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले. मंजूर तुकड्यांबाबतच्या पत्राची प्रत महाविद्यालयाकडे नसून शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण (अनुदान), पुणे विभाग, पुणे यांच्याकडून मागणी केली आहे. ती मिळताच देण्यात येईल, असे प्राचार्यांनी आपल्याला कळविले. परंतु अद्याप आपल्याला ती मिळाली नाही, असेही त्यांनी नमूद केले. सन १९९९ ते २००६ पर्यंत बी.कॉम-२ व बी.ए.-३ या वर्गाच्या प्रत्यक्षात तीन तुकड्या असताना चार दाखविल्या, दोन तुकड्या जादा

असल्याचा कार्यभार दाखवून गरज नसताना एक प्राध्यापक पूर्ण वेळ केला, ही शासनाची फसवणूक आहे, असे प्रतिपादन प्रा.घत्तरगी यांनी केले.

प्रा.घत्तरगी याबाबत सातत्याने पत्रे व भाष्य करणारे अर्ज पाठवीत असून त्यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे, हे त्यातून स्पष्ट होत नाही. मात्र त्यातील नेमकेपण स्पष्ट झालेली माहिती त्यांना देण्यात आलेली आहे, असे प्राचार्य, संगमेश्वर कॉलेज डॉ.जी.एन.चिट्टे यांनी नमूद केले. तुकड्या मंजुरीबाबतचे पत्र, नव्याने नियुक्ती केलेल्या प्राध्यापकाला दिलेले वेतन ही माहिती देणे शक्य असतानाही दिलेली नाही, याकडे प्रा.घत्तरगी यांनी लक्ष वेधले. मात्र तुकड्या मंजुरीचे पत्र उपलब्ध नाही, असे मुद्दा क्र.४ वर कळविले आहे व बाकी सर्व तपशील देण्यात आला आहे, असे प्राचार्य डॉ.चिट्टे यांनी अनुषंगिक कागदपत्रांच्या प्रतींसह नमूद केले. महाविद्यालयात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची अंमलबजावणी गांभीर्याने होत नसल्याचा आक्षेप प्रा.घत्तरगी यांनी लेखी व तोंडी नोंदविला. प्रा.डॉ.चिट्टे यांनी तो नाकारला, व माहिती अधिकारी, सहाय्यक माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची नावे कळविणारे पत्र दि.१७.१०.२००५ रोजी कोल्हापूर विभागाच्या शिक्षण संचालनालयाला पाठविले असल्याचे नमूद करुन त्याची प्रत सादर केली.

उभय बाजूंची लेखी व तोंडी निवेदने, व सादर केलेली कागदपत्रे यांचा विचार करता प्रा.घत्तरगी यांनी उपस्थित केलेले मुद्दे महत्त्वाचे असले तरी प्राध्यापकाची नियुक्ती योग्य की अयोग्य, खोटी माहिती देऊन उपसंचालक, उच्च शिक्षण (अनुदान), कोल्हापूर यांच्याकडून मान्यता मिळवून लाखो रुपये वेतन अदा करुन शासनाची फसवणूक केली का, हे मुद्दे राज्य माहिती आयोगाच्या कक्षेतील नाहीत. मात्र या संदर्भात प्रा.घत्तरगी यांनी मागितलेली माहिती त्यांना दिली जाणे आवश्यक आहे. तुकड्यांना मंजुरी देण्याबाबतचे पत्र महाविद्यालयाकडे उपलब्ध नसले तरी प्रा.घत्तरगी यांनी मागणी केल्यापासून दिड वर्षानंतरही ते मिळू शकत नाही, हे योग्य नाही. देय माहिती पाच दिवसात देण्याचा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्यानुसार मुद्दा क्र.४ ची माहिती देण्यात आली असून तुकड्या मंजुरीच्या पत्राची प्रत मागणारे पत्र शिक्षण संचालकांकडे खास दूताकरवी दि.२.२.२००८ रोजी पाठविण्यात आले असल्याचे प्राचार्य डॉ.चिट्टे यांनी दि.४.२.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले. मात्र

आपल्याला अद्यापही ही प्रत मिळाली नसल्याचे प्रा.घत्तरगी यांनी २२.२.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे. संबंधित प्रत शिक्षण संचालनालयाने महाविद्यालयाला त्वरित देणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) तुकड्या मंजुरीच्या पत्राची प्रत शिक्षण संचालनालय,पुणे यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन प्रा.घत्तरगी यांना निःशुल्क द्यावी. शिक्षण संचालनालयाने दि.१५.९.२००८ पर्यंत ही प्रत महाविद्यालयाकडे सुपूर्त करावी. याबाबतचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, संगमेश्वर कॉलेज, सोलापूर व शिक्षण संचालनालय, पुणे यांनी आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.८.२००८**

**प्रतः:शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण अनुदान, पुणे**

२/- तुकड्या मंजुरीच्या पत्राची प्रत संगमेश्वर कॉलेज, सोलापूर यांना त्वरित उपलब्ध करुन द्यावी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि.१२.६.२००८ रोजी येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २११९/ पुणे | श्री. यशवंत रघुनाथ राहिंज श्रीनिवास, शितोळे नगर, लिटल फ्लॉवर स्कूल समोर, मेन रोड, सांगवी, पुणे-२७ | उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक ), जिल्हा परिषद, पुणे | शिक्षणाधिकारी (प्राथमिक ), जिल्हा परिषद, पुणे | सेवाज्येष्ठतेप्रमाणे सेवा निवृत्ती वेतन सुरू होणे बाबत, सदर पद 'एकाकी' असल्याने अन्य कर्मचाऱ्यांची सेवा निवृत्ती वेतनाची काय कार्यवाही झाली त्याबाबत माहिती | आवश्यक माहिती मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे यांचे कार्यालयात समक्ष प्राप्त झाली असल्याचे अपीलकर्त्याने दि. २८.७.२००८ रोजी आयोगास सादर केलेल्या पत्रामध्ये नमूद केले आहे. |
| २ | २८६/ पुणे | श्री. दत्तात्रय मणेप्पा मुलगे द्वारा उप विभागीय अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विकास उप विभाग क्र.४, पुणे-१ | सहाय्यक अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे-१ | अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे-१ | स्थानिक खरेदीमध्ये भांडारपाल यांनी केलेली अनियमितता, त्यासंबंधी झालेल्या चौकशी अहवाला-संबंधी सर्व माहिती व त्या संदर्भातील पत्र व्यवहाराच्या प्रती | सर्व माहिती प्राप्त झाल्याचे नमूद करून अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती अपीलकर्त्याने दि. २४.६.२००८ च्या पत्रान्वये आयोगास केली आहे. |

उपरोक्त अपीलकर्त्यांच्या विनंतीचा विचार करता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(स्वाक्षरी)
(शिक्का: राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० -०८-२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौंसिल हॉलसमोर,
पुणे -४११ ००१

श्री.मुकुंद डोंगरी काटे
घ.नं.४६७, आवसे वस्ती, आमराई, लक्ष्मी पेठ,
देगाव रोड, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, सह्याद्री प्रशाला, आवसे वस्ती,
आमराई लक्ष्मी पेठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१७ / सोलापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१.२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मुकुंद डोंगरी काटे
घ.नं.४६७, आवसे वस्ती, आमराई, लक्ष्मी पेठ,
देगाव रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, सह्याद्री प्रशाला, आवसे वस्ती,
आमराई लक्ष्मी पेठ, सोलापूर श्रीमती शालिनी मारुती चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१५.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.७.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सह्याद्री शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर-१, संस्थेच्या संचालक मंडळाची नावे, पत्ते, शाळेतील खोल्यांची संख्या, लांबी रुंदी, शाळेची जागा संस्थेची की भाड्याने, शाळेतील शिक्षकांचे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नाव व पत्ते, शाळेस खेळाचे मैदान आहे का, शिक्षकांसाठी संडास-बाथरुमची सोय आहे का, इयत्ता ५ वी ते सातवीच्या ए.सी.सी.मुलींची संख्या नावानिशी, प्रत्येक वर्षाची त्यांना शासनाकडून देण्यात आलेली स्कॉलरशिप, त्याचे वाटप केलेल्यांची नावे व पत्ते, दहावी पास मुलांची शासनाकडून मिळालेली शैक्षणिक फी, प्रत्येक वर्षाची दहावीच्या मुलांची नावे व पत्ते, किती मुलांना शैक्षणिक फीचे वाटप केले व एकूण किती रक्कम शासनाकडून आली याची माहिती. | |

## विवेचन

सह्याद्री शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर-१ संस्थेच्या संचालक मंडळाची नावे व पत्ते, इयत्ता दहावीच्या मुलांची नावे व पत्ते इत्यादी सन २००१ ते २००५ पर्यंतच्या काळातील माहिती वर्षवार मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री.मुकुंद डोंगरी काटे यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक , सह्याद्री प्रशाला, आवसे वस्ती, आमराई, लक्ष्मी पेठ, सोलापूर याच्याकडे केली होती. त्यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे श्री.काटे यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर याच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी माहिती देण्याबाबत संस्थेला कळविले. तरीही शाळेकडून माहिती मिळाली नाही, म्हणून श्री.काटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपण पाच-सहा वेळा अर्ज केला असताना जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका श्रीमती शालिनी मारुती चव्हाण यांनी तो स्वीकारला नाही, रजिस्टर टपालही नाकारले. संस्थेला

विचारुन उत्तर देऊ, असे सातत्याने सांगितले, असे श्री.काटे यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. श्री.काटे यांचे माहिती-मागणीचे कोणतेही पत्र आपल्याला मिळाले नव्हते. त्यांनी कोणती माहिती मागितली आहे, अशी विचारणा आपण अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे पत्राद्वारे केली होती. तसेच पत्र श्री.काटे यांनाही पाठविले होते, असे मुख्याध्यापिका श्रीमती चव्हाण यांनी सांगितले. आपल्याला शाळेकडून आलेल्या पत्रात कोणताही मजकूर नव्हता. केवळ एक कागदाचे चिटोरे होते असे प्रतिपादन श्री.काटे यांनी केले. श्री.काटे हे आपल्याकडे वारंवार विचारणा करीत असून माहिती त्वरित सादर करण्याबाबत आपण दि.१.१२.२००७ रोजी संस्थेला पुन्हा कळविले, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री.एम.एन.वीर यांनी नमूद केले. श्री.काटे यांनी समक्ष शाळेत यावे. आपण त्यांना कोणतीही माहिती देण्यास तयार आहोत, असे मुख्याध्यापकांनी सूचित केले होते व त्याप्रमाणे दि.२७.१२.२००६ रोजी मुख्याध्यापकांकडून माहिती प्राप्त झाल्याचे पत्र श्री.काटे यांनी आपल्या कार्यालयात सादर केले आहे, असे श्री.वीर यांनी लेखी व तोंडी नमूद केले. मात्र हे पत्र आपले नाही, असा दावा श्री.काटे यांनी केला.

संबंधित शिक्षण संस्थेत अंतर्गत वाद आहेत व त्यातून परस्परांवर आरोप-प्रत्यारोप व अन्य प्रकारे संघर्ष चालू असल्याचे उभय बाजूंच्या निवेदनावरुन दिसते. श्री.काटे व श्रीमती चव्हाण यांनीही परस्परांवर माहिती न देणे, खोटी माहिती देणे, आपल्या नावे बनावट पत्रे सादर करणे आदी आरोप केले. या पत्रांच्या संदर्भात आपण पोलीस चौकशीला सामोरे जाण्यास तयार आहोत, असे दोघांनीही सांगितले. या सर्व बाबी लक्षात घेता खरेखोटेपणाची शहानिशा करणे आपल्याला कठीण होत असल्याचे श्री.वीर यांनी नमूद केले, ते रास्त आहे. शिक्षणासारख्या क्षेत्रातील ही स्थिती चिंताजनक म्हणावी लागेल.

श्री.काटे यांनी मागितलेल्या माहितीमध्ये सार्वजनिक हित कोणते आहे, हे ते सिध्द करु शकलेले नाहीत.

पाचवी ते सातवीपर्यंतच्या मुलींची नावे व दहावीच्या मुलांचे नाव व पत्ते आदी यादी देण्याचे कारण नाही. अन्य देय माहिती मात्र दिली पाहिजे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, सह्याद्री प्रशाला यानी देय माहिती श्री.काटे यांना दिल्याबाबतचा अहवाल दि.२०.८.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(३) अवाजवी तपशिलासह विस्तृत माहिती मागून सर्व यंत्रणांच्या वेळेचा अपव्यय न करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.८.८.२००८
ऑगस्ट-०८-४१-४३

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौंसिल हॉलसमोर,
पुणे -४११ ००१

श्री.निजलिंगप्पा महादेव इंगळे
१२९, बुधवार पेठ, सोलापूर — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (म),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्य अधिकारी,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१९ +२२० / सोलापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१.२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.निजलिंगप्पा महादेव इंगळे
१२९, बुधवार पेठ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (म),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.जी.आर.गोडबोले

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्य अधिकारी,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर डॉ.एम.के.अहिवळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३१.७.२००६ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती |
|---|---|
| | श्री.सुनिल माने यांना घर नं.८० बुधवार पेठ, सोलापूर येथे पिठाच्या गिरणीस ना हरकत प्रमाणपत्र दिले त्यावर आरोग्य अधिकाऱ्याची सही नाही. तसेच सदरची जागा ही श्रीमती मुक्ताबाई तात्या धोत्रे यांच्या मालकी हक्काची असताना श्री.माने यांना ना हरकत प्रमाणपत्र व परवाना कशाचे आधारे दिला. अकरा वर्षे परवाना नुतनीकरण कसा केला. सदर जागेच्या मालकीचा असेसमेंट उतारा, १९९५ पासून कर भरल्याच्या पावत्याच्या मूळ प्रती, घर नं.८०, बुधवार पेठ यांचा ना हरकत दाखला, कराचे बिल क्र.२३९८३ दि.१.४.१९९४ झोपडी क्र.८० खाडाखोड करुन तसेच बिल क्र.४२७३ दि.२८.९.१९९४ खोटी पावती करुन म.रा.वि.मंडळाकडे जोडून मुख्य पत्त्यावर कनेक्शन न घेता अतिक्रमण जागेत १२९, बुधवार पेठ ह्या पत्त्यावर कनेक्शन घेऊन मिरची कांडप चालू केले, त्याचे उत्तर कागदपत्रे उपलब्ध होत नाहीत असे दिले. हे दोन परवाने वेगवेगळ्या ठिकाणचे आहेत का.,इ. |

## विवेचन

श्री.सुनील शरणाप्पा माने यांना पिठाची गिरणी व मिरची कांडप मशीन यांना एकाच जागेवर दोन परवाने व वीजजोड कशाच्या आधारे दिला, याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.निजलिंगप्पा महादेव इंगळे यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (म), महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे केली होती. (अपील क्र.२१९) तसेच झोपडपट्टी क्र.८० येथील पिठाची गिरणी व मिरची कांडप मशीन याचे श्री.माने यांना दिलेले परवाने रद्द करणार की नाही, अशी विचारणाही त्यांनी (अ.क्र.२१९) केली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळे श्री.इंगळे यांनी अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे अपील केले. श्री.इंगळे यांनी केलेले अपील मुदतीत नव्हते, तसेच त्यांची मागणी परवाने रद्द करावेत व परवाने देणाऱ्यावर योग्य ती कारवाई करावी अशी होती, माहितीशी याचा संबंध नसल्यामुळे अपील नाकारल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. त्याविरुध्द श्री.इंगळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.इंगळे व श्री.माने यांच्यात गेल्या काही वर्षांपासून वाद सुरु असून त्या अनुषंगाने उभय बाजू विविध पातळ्यांवर अर्ज, दावे, प्रतिदावे आदी करीत आल्या आहेत. आयोगाने यापूर्वी त्यांच्या अशा अपिलांबाबत दखल घेतली आहे. ही दोन्ही अपिले त्याच स्वरुपाची आहेत. अ.क्र.२२० हे महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००२ अन्वये केलेले आहे.

श्री.माने यांनी १९९५ साली परवान्यासाठी अर्ज केले होते. त्या कागदपत्रांची मुदत पाच वर्षांची असल्यामुळे ते नष्ट करण्यात आलेले आहेत. तत्कालीन आरोग्य अधिकाऱ्यांची सही परवान्यावर नव्हती म्हणून ते बेकायदेशीर ठरवून महापालिकेने रद्द केले, त्याविरुध्द श्री.माने न्यायालयात गेले आहेत, असे जन माहिती अधिकारी डॉ.एम.के.अहिवळे व अपिलीय प्राधिकारी श्री.जी.आर.गोडबोले यांनी स्पष्ट केले. तसेच संबंधित दोन कर्मचाऱ्यांविरुध्द केलेल्या कारवाईचा तपशीलही श्री.इंगळे यांना कळविण्यात आला असल्याचे नमूद करुन त्यांनी संबंधित कागदपत्रे सादर केली.

परवान्याबाबत दोन पत्ते कसे व श्री.माने यांनी कर भरल्याच्या पावत्या मागवून घेऊन तपासून प्रमाणित करुन द्याव्यात, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. या पावत्या त्वरित देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले.

श्री.माने यांनी कर भरल्याच्या तीन पावत्या दि.३•१२•२००४ (पावती क्र.३३५५), दि.१९.१.२००६(पावती क्र.१६६५०), दि.५.२.२००८(पावती क्र.३९८७), तसेच दोन पत्त्यांबाबतची माहिती पूरक कागदपत्रांसह श्री.इंगळे यांना देण्यात आल्याचे आरोग्य अधिकारी श्री.एम.के.अहिवळे यांनी दि.५.२.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) परवाने रद्द करण्यासारख्या प्रशासकीय कार्यवाहीच्या मागणीचे अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंतर्गत करु नयेत, अशी समज अपीलकर्त्यास यापूर्वीही देण्यात आली आहे, ती पुन्हा देण्यात येत आहे. तसेच एकाच विषयाबाबत सातत्याने माहितीच्या अधिकारांतर्गत अर्ज व अपिले करुन सर्व यंत्रणांचा वेळ अकारण घेऊ नये अशी समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ७.८.२००८
ऑगस्ट-०८-४७-४९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१९.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३९ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. उमेश धोंडीबा सुरते<br>११७/८५, उमा नगरी, मुरारजी पेठ, सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, गुरूनानक नगर,<br>सोलापूर, जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, बांधकाम भवन,<br>कुमठा नाका, सोलापूर, जि. सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. उमेश धोंडीबा सुरते यांनी दोन माहिती अर्जाद्वारे (दि.३.११.२००६ चा व दि. १२.१२.२००६ चा ) अनुक्रमे खाजगीकरणाअंतर्गत विश्रामगृह प्रकल्पाच्या कामासंबंधी चार मुद्दयांची व सातरस्ता येथील खाजगीकरणा संदर्भात १.४ कोटी रूपयांच्या रस्ता दुरूस्ती कामा संदर्भात माहिती मागितली होती. दि. ३.११.२००६ च्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.११.२००६ च्या पत्राने माहिती डाकेने पाठविली. अपीलकर्त्याने ती स्वीकारली नाही. तसेच दि. १२.१२.२००६ च्या अर्जानुसार दि. १४.१२.२००६ च्या पत्राने रक्कम रू. १७५० /- शुल्क भरण्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविले असता ते पत्रही स्वीकारलेले नाही.

या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला असून त्यामुळे माहिती देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचे श्री. सुरते यांनी दि. २०.३.२००७ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. शुल्क भरल्यावर माहिती दिली जाईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या निवेदनात नमूद केले आहे. मात्र माहिती मागून टपाल न स्वीकारण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास त्याप्रमाणे माहिती प्राप्त करून घेता येईल.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** २० .८.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १८.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४७ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. सुभाष भिमराव गावसाने<br>मु. पो.साकत, ता.बार्शी, जि. सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | ग्राम विकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत साकत, ता. बार्शी, जि.सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी<br>पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. सुभाष भिमराव गावसाने यांनी साकत ग्रामपंचायतमध्ये श्री. रमेश मारूती मोरे यांची ग्रामशिक्षण समिती साकतचे अध्यक्ष म्हणून नेमणूक झालेल्या ठरावाची नक्कल, दि. ३१.१.२००६ रोजी ग्रामसभेत ग्राम शिक्षण समितीची नेमणूक झाल्यानंतर समितीचे सचिव यांना त्याची प्रत दिल्याच्या पोहचची नक्कल जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, साकत यांच्याकडे मागितली होती.

परंतु अपीलकर्ता यांनी माहिती मिळाली नसल्याचे निवेदनाद्वारे आयोगास दि. १३.६.२००८ च्या पत्रान्वये कळविले. अर्जातील स्तंभ क्र.१ ची माहिती श्री. गावसाने यांना दि. ९.१.२००७ रोजी दिली नसून दि. २१.१.२००७ रोजी रजिस्टर्ड पा. नंबर ५७०५ ने पाठविली आहे. स्तंभ २ ची माहिती दि. ९.१.२००७ रोजी श्री. गावसाने यांना दिली नसल्यामुळे त्याची पोहोच देण्याचा प्रश्न उद्भवत नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले. सदरची माहिती दि. ४.६.२००७ रोजी मिळाल्याची पोहोच जन माहिती अधिकाऱ्यानी आयोगास सादर केली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. 30 .८.२००८**

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १७.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५६ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. आप्पासाहेब शंकरराव अक्कलकोटे<br>२१, सिध्देश्वरनगर, विजापूर रोड, भारती विद्यापीठजवळ, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार<br>अक्कलकोट, जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, अक्कलकोट, जि. सोलापूर | हजर |

तहसीलदार, अक्कलकोट यांनी त्यांचेकडील पत्र क्र. जमा.१/कावि/८५/२००४ दि. २७.२.२००४ या पत्राद्वारे उपविभागीय अधिकारी, सोलापूर विभाग, सोलापूर यांना सामुदायिक संस्था विसर्जित झाली असल्यास सामुदायिक शेती संस्थेचे सभासदास जमीन वाटप करावी असे शासनाचे आदेश असल्याचे नमूद केल्याने सदर आदेशाची साक्षांकित प्रत, आदेश, आकारीपड जमिनीस लागू आहेत काय, आकारीपड जमिनीस लागू नसल्यास चुकीची माहिती नमूद करणारे अधिकारी/कर्मचारी यांची नावे व हुद्दे याची माहिती अपीलकर्ता श्री. आप्पासाहेब शंकरराव अक्कलकोटे यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, अक्कलकोट यांच्याकडे मागितली होती. शासन निर्णय दि. ९.१.१९७३ च्या उपलब्ध प्रती अपीलकर्त्यास दिल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी नमूद केले. मात्र शासन निर्णय तीन पानांचा असून दोनच पाने उपलब्ध असल्यामुळे मी दिली, हे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, अक्कलकोट श्री. दिपक एकनाथ शिंदे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, अक्कलकोट श्रीमती रेखा वाघमारे यांचे प्रतिपादन योग्य नाही. माहिती अपुरी दिली.

असाच त्याचा अर्थ होतो. पूर्ण माहिती दि. २०.९.२००८ पर्यंत न दिल्यास संबंधित शास्तीस व कारवाईस पात्र ठरतील.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. संबंधित शासन निर्णयाची प्रत जन माहिती अधिकारी, अक्कलकोट यांनी दि. २०.९.२००८ पर्यंत अपीलकर्त्यास देऊन पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

पुणे
दि. ३० .८.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ